# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:04.05.2026** **वार: सोमवार**

---

1. मिशन दृष्टी हे भारताच्या अंतराळ प्रवासातील एक महत्त्वपूर्ण यश असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळम, आसाम आणि पुदूच्चेरी विधानसभा निवडणुकांची आज मतमोजणी
3. नसरापूर अत्याचार आणि हत्या प्रकरणात विशेष तपास पथकाची नेमणूक
4. रायगड जिल्ह्यात दरड-प्रवण गावांच्या संख्येत वाढ आणि
5. पुणे विमानतळावर 1 कोटी 17 लाख रुपये किंमतीचा अमली पदार्थ जप्त

**<u>पंतप्रधान-मिशन दृष्टी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी GalaxEye चे मिशन दृष्टी भारताच्या अंतराळ प्रवासातील एक महत्त्वपूर्ण यश असल्याचं म्हटलं आहे. OptoSAR हा जगातील पहिला उपग्रह आणि भारतातील खासगी क्षेत्राद्वारे निर्मित आतापर्यंतचा सर्वात मोठा उपग्रह आहे. त्याचं यशस्वी प्रक्षेपण हे, नाविन्यपूर्ण संशोधन आणि राष्ट्रनिर्मितीप्रती असलेल्या युवा वर्गाच्या ध्येयनिष्ठेचा एक ज्वलंत पुरावा असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमावरील एका संदेशामध्ये म्हणलं आहे.

बंगळुरूच्या गॅलेक्स आय या स्टार्टअपनं तयार केलेल्या मिशन दृष्टी या उपग्रहाचं काल कॅलिफोर्नियातून प्रक्षेपण करण्यात आलं. 190 किलो वजनाचा मिशन दृष्टी हा खासगी भारतीय कंपनीनं बनवलेला सर्वात मोठा आणि इलेक्ट्रो-ऑप्टिकल आणि सिंथेटिक ॲपर्चर रडार सेन्सर्स या दोन गोष्टींचं एकत्रीकरण करणारा हा जगातला पहिला ऑप्टोसार उपग्रह आहे. त्याच्याद्वारे ऑप्टिकल आणि रडार दोन्ही प्रकारे इमेजिंग होऊ शकते. ढगांच्या पलीकडे आणि रात्री अंधारातही हा उपग्रह स्पष्ट छायाचित्र घेऊ शकतो.

**<u>निवडणूक निकाल</u>**

पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम आणि केंद्रशासित प्रदेश पुदुच्चेरीमध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांसाठीच्या मतांची मोजणी आज होणार आहे. आसाममधील सर्व 126 जागा, केरळमधील 140 जागा आणि पुद्दुचेरीमधील 30 जागांसाठी मतदान 9 एप्रिलला झालं होतं. तामिळनाडूतील 234 विधानसभा मतदारसंघ आणि पश्चिम बंगालमधील 293 विधानसभा जागांसाठी मतांची मोजणीही आजच होणार असून संध्याकाळपर्यन्त सविस्तर निकाल हाती येतील. महाराष्ट्रातल्या बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीची मतमोजणीही आज होणार आहे.

**<u>नसरापूर</u>**

नसरापूर इथल्या बालिका अत्याचार आणि हत्या प्रकरणाचा तपास आता अत्यंत वेगानं आणि सखोल पद्धतीनं करण्यासाठी पुणे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी विशेष तपास पथकाची घोषणा केली आहे. या पथकात पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीप सिंग गिल यांच्या मार्गदर्शनाखाली 6 पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तपासात कोणत्याही त्रुटी राहू नयेत आणि पीडितेला लवकरात लवकर न्याय मिळावा, या उद्देशानं हे पथक काम करेल. या प्रकरणाची राष्ट्रीय महिला

आयोगानं स्वतःहून दखल घेतली असून आयोगानं या घृणास्पद गुन्ह्याचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगानं देखील या घटनेची गंभीर दखल घेतली आहे.

नसरापूर इथल्या बालिकेवरचा अत्याचार आणि हत्या ही गंभीर घटना असून नागरिकांचा रोष साहजिक आहे, मात्र या आरोपीला कठोर शिक्षा होईल याची काळजी राज्य सरकार घेत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ते काल नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. दरम्यान, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी पुण्यातील पीडित मुलीच्या घरी जाऊन कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. कुटुंबीय आणि स्थानिक नागरिकांनी आरोपीला तातडीनं कठोर शिक्षा देण्याची मागणी केली असून, यासाठी वरिष्ठ सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्याकडे पाठपुरावा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<u>राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम</u>**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं लहान मुलांमधल्या मधुमेहाबाबत काल एक सर्व समावेशक मार्गदर्शक दस्ताऐवज जारी केला. सार्वजनिक आरोग्य सेवा वितरणातील सर्वोत्तम कार्यपद्धतींवरील राष्ट्रीय शिखर परिषदेत हा दस्ताऐवज प्रकाशित करण्यात आला. लहान मुलांच्या मधुमेहावरील उपचारांचा सार्वजनिक आरोग्यवस्थेत समावेश करणाऱ्या निवडक देशांमध्ये आता भारताचा समावेश झाला आहे. या नव्या मार्गदर्शक तत्त्वानुसार बाळ जन्मल्यापासून ते अठरा वर्षांपर्यंतच्या मुलांची सार्वजनिक आणि शालेय पातळीवर तपासणी केली जाणार आहे.

**<u>अकोला-तिरूपती रेल्वे</u>**

विदर्भ, मराठवाडा, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश या ठिकाणांना एका सूत्रात बांधणाऱ्या तिरुपती-अकोला- तिरुपती या साप्ताहिक एक्स्प्रेसचा शुभारंभ करण्यात आला आहे. खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते अकोला स्थानकावरून या एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. ही रेल्वे दर आठवड्यातील रविवारी आठ वाजून 10 मिनिटांनी धावणार असून या रेल्वेमुळे अकोला, वाशिम, हिंगोली, पूर्णा, नांदेड, निजामाबाद आणि सिकंदराबादमार्गे थेट तिरुपती गाठता येणार आहे. यानिमित्त बोलताना खासदार धोत्रे म्हणाले...

**अकोला जंक्शन भविष्यामध्ये अत्यंत महत्त्वाचा जंक्शन होणार आहे. सध्याही अकोला स्टेशनवर जे पॅसेंजर्स आहेत यांची संख्या जवळपास दिवसाला वीस ते पंचवीस हजार असते येत्या काळामध्ये गतिशक्ती टर्मिनलच्या माध्यमातून उद्योगालाही एक मोठी चालना भविष्यामध्ये मिळणार आहे समृद्धी महामार्गाला जोडणारा हा ट्रॅक आहे आणि विशेष महत्त्व नॉर्थ साउथ कनेक्टिव्हिटी असेल ईस्ट ते वेस्ट कनेक्टिव्हिटी असेल याकरिता अत्यंत महत्त्वाचा हा टर्मिनल आहे**

**<u>रायगड-संकट प्रवण</u>**

अनियंत्रित माती आणि मुरूम उत्खनन, मोठ्या प्रमाणात वृक्षतोड, विकासाच्या नावाखाली सुरू असलेली डोंगर फोडण्याची कामं यामुळं रायगड जिल्ह्यातील 392 गावांवर दरड कोसळण्याच्या धोका निर्माण झाला आहे. याविषयी आमच्या प्रतिनिधीनं पाठविलेला हा वृत्तांत...

**पावसाळा आला की, रायगड जिल्ह्याला हमखास दरडी कोसळणे, समुद्राला येणारी उधाणं आणि महापूर अशा तिहेरी संकटांना तोंड द्यावे लागते.. या नैसर्गिक संकटांना तोंड देणारया गावांची संख्या 673 च्या आसपास आहे.. यातील चिंताजनक बाब म्हणजे ही संख्या उत्तरोत्तर वाढत आहे, ही बाब सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट दिसते.. 10 वर्षांपुर्वी दरडी कोसळण्याचा धोका असलेल्या गावांची संख्या 103 होती, आता 392 पर्यत गेली आहे.. अनियंत्रित माती, मुरुम, दगड उत्खनन, बेसुमार वृक्ष तोड आणि विकासाच्या नावाखाली डोंगर कापण्याची सुरू**

**असलेली कामं ही काही त्याची कारणं आहेत. रायगड जिल्ह्यात सावित्री, कुंडलिका, गाढी, अंबा, पाताळगंगा अशा प्रमुख नद्या असून या नद्यांना येणारया महापुरामुळे 136 गावांना धोका पोहोचतो.. तसेच समुद्राची पातळी वाढत असून 145 गावांना उधाणाचा धोका निर्माण होऊ शकतो.. त्यामुळे पावसाळा आला की, अनेक गावांची झोप उडते.. सरकार या काळात काही उपाययोजना करते मात्र निसर्गाच्या प्रकोपापुढे त्या अपुरया ठरतात. शोभना देशमुख, आकाशवाणी बातम्यांसाठी, अलिबाग रायगड.**

**<u>अमली पदार्थ</u>**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागानं केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून, या प्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली आहे. बँकॉकहून पुण्यात आलेल्या एका प्रवाशाच्या सामानातून 3 किलो 348 ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला. बेकायदेशीर बाजारातील त्याची अंदाजे किंमत 1 कोटी 17 लाख रुपये आहे. बँकॉकहून पुण्यात येणाऱ्या एका प्रवाशाबाबत संशय आल्यानंतर त्याच्या सामानाची तपासणी केल्यावर सहा पारदर्शक पाकिटांमध्ये हा अमली पदार्थ लपवल्याचं उघडकीस आलं.

**<u>भूखंड-नाशिक</u>**

आर्थिक दुर्बल घटकांसाठी म्हाडाला जागा द्यावी लागू नये यासाठी भूखंडाचे तुकडे करून लेआऊट केल्या प्रकरणी नाशिक पोलीसांनी काल नायब तहसीलदार नितीन पाटील यांना अटक केली. त्याना तीन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. 49 लेआऊट म्हणजेच अभिन्यासापैकी 21 प्रकरणात फेरफार नोंदी करण्याचे आदेश नितीन पाटील यांनी दिले होते. या प्रकरणात नाशिक पोलीसांनी 194 भूखंड मालक, विकासक आणि त्यांचे भागीदार यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

**<u>अश्विनी सानप- नंदुरबार</u>**

नंदुरबार जिल्ह्यातील गुन्हेगारीचा कल पाहता समाजाभिमुख पोलिसींग राबविण्याचा मानस नंदुरबारच्या नवनियुक्त पोलीस अधिक्षक अश्विनी सानप यांनी व्यक्त केला आहे. जिल्ह्याला लाभलेल्या त्या दुसऱ्या महिला पोलीस अधिक्षक आहेत.

**<u>सायकलिस्ट क्लब-रत्नागिरी</u>**

रत्नागिरी सायकलिस्ट क्लबनं काल रत्नागिरी शहरात आयोजित केलेल्या किड्स सायक्लोथॉनमध्ये पाचशेहून अधिक मुलांनी सहभाग घेतला. दहा आणि पाच किलोमीटर प्रकारात 'सुपरहिरो ऑन सायकल' अशी या सायक्लोथॉनची संकल्पना होती.  महिला आणि बालविकास विभागाच्या माध्यमातून या सायक्लोथॉनमध्ये 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा संदेश प्रभावीपणे प्रसारित करण्यात आला.

**<u>हवामान</u>**

मराठवाड्यात काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. अन्य जिल्ह्यांमध्ये आकाश निरभ्र राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.